# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक ५७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## लोटेतील लक्ष्मी ऑरगॅनिकविरोधात लवकरच परिषद व भव्य मोर्चा

रत्नागिरी दि.१७ (प्रतिनिधी)- खेड तालुक्यातील लोटे औद्योगिक वसाहतीतील लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनी विरोधात कोकण पर्यावरण संघर्ष समितीच्या माध्यमातून लवकरच परिषद घेऊन भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती माजी खासदार हुसेन दलवाई यांनी मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. या आंदोलनाच्या तयारीसाठी गावागावांत सुरू असलेल्या बैठकींना ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. दलवाई म्हणाले, ''सरकार व अधिकाऱ्यांच्या आशिर्वादानेच ही कंपनी सुरू झाली असून येथे घातक पीपासचे उत्पादन घेतले जात आहे. याची पूर्ण कल्पना सरकारला आहे. काही दिवसांपूर्वी येथे भेट दिलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कंपनी कोकणसाठी हानिकारक ठरत असल्यास ती बंद केली जाईल, असे सांगितले. मात्र प्रत्यक्षात तसे काही घडताना दिसत नाही. कंपनी घातक आहे की नाही, हे जाणून घ्यायचे असल्यास सरकार आमच्याशी चर्चा का करत नाही?'' असा सवालही त्यांनी उपस्थित केला. ''सरकार काय भूमिका घेते, हे आमच्यासाठी दुय्यम आहे. आम्ही सर्वांना बरोबर घेऊन एकत्रित लढा उभारणार असून कंपनी बंद करण्यास भाग पाडू,'' असे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, बाधित ग्रामस्थांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी सध्या गावागावांत बैठका घेतल्या जात आहेत. आयनी, असगणी, दाभिळ, मेटे, कोतवली, घाणेकुंट, सातवीन गाव, लवेल, सोनगाव आणि मालदोली येथे बैठका पार पडल्या असून ग्रामस्थांनी संघर्ष समितीच्या लढ्याला एकमुखी पाठिंबा दर्शवला आहे. ग्रामस्थांचे संघटन पूर्ण झाल्यानंतर तातडीने परिषद घेऊन महत्त्वाचे ठराव शासनाला पाठवण्यात येतील. त्यानंतर कंपनीला टाळे ठोकण्याच्या मागणीसाठी भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या लढ्यात सर्वांनी निपक्षपातीपणे सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# भारत आणि फ्रान्समध्ये विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी

## इमॅन्युएल मॅक्रोन यांच्यासोबतच्या बैठकीनंतर मोदींची घोषणा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन तीन दिवसीय भारत भेटीवर आले असून आज ते मुंबईत आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदीही आज मुंबईत आले होते. या दोन्ही वरिष्ठ नेत्यांमध्ये द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशातील व्यापारवृद्धीवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माध्यमांना संबोधित केले. यावेळी त्यांनी भारत आणि फ्रान्स यांच्यातील 'विशेष जागतिक धोरणात्मक भागीदारी'ची घोषणा केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ''भारत आणि फ्रान्स भारतात माउंट एव्हरेस्टच्या उंचीवर उडण्यास सक्षम असलेले जगातील एकमेव हेलिकॉप्टर तयार करतील आणि ते जागतिक स्तरावर निर्यात केले जातील. भारत-फ्रान्स भागीदारीला कोणत्याही सीमा नाहीत. या दोन्ही देशातील भागीदारी खोल महासागरांपासून सर्वात उंच पर्वतांपर्यंत पसरलेली असेल. जग अनिश्चिततेच्या काळातून जात असताना, भारत-फ्रान्स भागीदारी जागतिक स्थिरतेसाठी एक शक्ती बनेल, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत-फ्रान्सच्या द्विपक्षीय संबंधात संरक्षण, स्वच्छ ऊर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानातील सहकार्यावर भर दिला जाईल. त्यांनी नमूद केले की हा उपक्रम उद्योग, स्टार्टअप आणि एमएसएमई यांना जोडेल. विद्यार्थी आणि संशोधकांमधील देवाणघेवाणीला प्रोत्साहन देईल आणि फ्रान्ससोबत संयुक्त करारासाठी नवीन केंद्रे स्थापन करेल.

भारत-फ्रान्स नवोन्मेष वर्ष २०२६ निमित्त मॅक्रॉन यांचा हा चौथा भारत दौरा आहे आणि मुंबईला त्यांचा पहिलाच दौरा आहे. हा दौरा दोन्ही राष्ट्रांमधील वाढत्या धोरणात्मक आणि तांत्रिक भागीदारी मजबूत करेल.

फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आणि द्विपक्षीय संबंधांना ''उल्लेखनीय आणि अद्वितीय'' असं वर्णन केलं. ते म्हणाले की दोन्ही राष्ट्रांनी त्यांचे संबंध विश्वास, मोकळेपणा आणि महत्त्वाकांक्षेवर आधारित विशेष धोरणात्मक भागीदारीकडे नेण्याचा निर्णय घेतला आहे.

# दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले

## सुप्रिया सुळेंचा विलीनीकरणाच्या चर्चेला पूर्णविराम

नवी दिल्ली दि.१७ (वृत्तसंस्था)- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अजित पवारांनी घेतलेले निर्णय अजित पवारांसोबतच गेल्याचे नमूद करत राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाच्या वादाला पूर्णविराम दिला. दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले. माझा भाऊ राहिला नाही. त्यामुळे आता त्या चर्चांना काही अर्थ उरत नाही, असे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, यावेळी त्यांनी पार्थ पवारांना मुंढवा भूखंड घोटाळ्यात देण्यात आलेल्या कथित क्लीनचिटवर भाष्य करण्यासही नकार दिला.



सरकारने पुण्यातील मुंढवा भूखंड घोटाळ्याच्या चौकशीसाठी महसूल सचिव विकास खारगे यांची समिती नियुक्त केली होती या समितीने आपला अहवाल सोमवारी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना सुपूर्द केला. या अहवालात पार्थ पवार यांना अभय देत या व्यवहारासाठी मदत करणाऱ्या २ सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली आहे. सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी या प्रकरणी नवी दिल्लीत पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी सदर अहवाल वाचल्याशिवाय त्यावर भाष्य करणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, प्रस्तुत अहवाल अद्याप जाहीर झाला नाही. त्यामुळे सूत्रांच्या अहवालावर मी काहीही बोलणार नाही. एक लोकप्रतिनिधी म्हणून असे अहवाल प्रत्यक्षात वाचल्याशिवाय मी प्रतिक्रिया देऊ शकत नाही. असे अहवाल गोपनीय असतात. त्यामुळे ते बाहेर येत नाहीत. त्यातही एखादा अहवाल प्रसिद्ध झाला तर ते वाचल्याशिवाय मी प्रतिक्रिया देत नाही. पण हे प्रकरण उजेडात आल्यानंतर मी त्यात पार्थ पवारांचे नाव आल्याचे टीव्ही चॅनलवर पाहिले होते. त्यानंतर मी स्वतःहून त्याला फोन केला. त्याला या प्रकरणाची माहिती विचारली. त्यावर तो म्हणाला होता की, आत्या मी काहीही चुकीचे केले नाही. यावर मी तुम्हाला सविस्तर (पान ४ वर)

### अजितदादांच्या विमान अपघातातील ब्लॅक बॉक्सवर आगीचा दुष्परिणाम; एएआयबीची माहिती

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- अजित पवार यांच्या विमान अपघाताला जवळपास तीन आठवडे पूर्ण होत आले आहेत. या अपघाताच्या प्राथमिक अहवालाची सर्वांनाच प्रतीक्षा आहे. मात्र ज्या ब्लॅक्स बॉक्सच्या आधारे हा तपास होणार आहे, तो जळालेल्या अवस्थेत असल्यामुळं तपासात मर्यादा येत असल्याचं समोर आलं होतं. त्यासाठी हा ब्लॅक बॉक्स आता परदेशी पाठवण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. याचदरम्यान एअर एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने एक महत्वाची माहिती दिली आहे.

विमानातील दोन्ही रेकॉर्डरवर उच्च तापमानाचा (आगीचा) दुष्परिणाम झाला आहे. विमानातील दोन्ही रेकॉर्डर जास्त वेळ आगीत राहिल्यामुळे त्यावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे विमानातील दोन्ही रेकॉर्डरमधील डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहेत. ज्या देशात विमान बांधणी झाली आहे, त्या देशातील अधिकृत प्रतिनिधींकडून या प्रकरणी मदत मागितली आहे, अशी माहिती एअर एक्सीडेंट इन्वेस्टिगेशन ब्युरोने दिली आहे. त्यामुळे आता या ब्लॅक बॉक्सचं पुढे काय होणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# विमानाचा ब्लॅकबॉक्स बॉम्बस्फोटापासून सुरक्षित, पण राजकारणापासून नाही-रोहित पवार

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पुन्हा एकदा अजित पवारांच्या विमान अपघातावर संशय व्यक्त केला आहे. सरकारकडून अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास अतिशय संथ गतीने सुरू आहे. या प्रकरणी कुठेच काही होताना दिसून येत नाही. व्हीएसआर कंपनीही अजून सुरू आहे. विमानाचा ब्लॅकबॉक्स पाऊस, आग, उन व बॉम्बस्फोटांपासून सुरक्षित आहे, पण राजकारणापासून सुरक्षित नाही, असे ते म्हणालेत. दरम्यान, रोहित पवार उद्या पुन्हा पत्रकार परिषद घेऊन त्यांच्याकडे आलेली नवीन माहिती सार्वजनिक करणार आहेत.

रोहित पवारांनी आज येथील एका सेशन कोर्टात हजेरी लावली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, मी माझ्या ईडीच्या केसच्या बाबतीत आज सेशन कोर्टात आलो होतो. याच केसमध्ये अजित पवारांचीही केस आहे. ईओडब्ल्यूने प्रस्तुत प्रकरणात ईडीला सांगितले आहे की, या प्रकरणात कुठेच काही चुकीचे झाले नाही. त्यामुळे हा विषय आमच्यासाठी संपला आहे. पण आश्चर्य पाहा ईडी काही हा विषय सोडत नाही. १३ फेब्रुवारीला अजित पवार जाऊन १५ दिवस झालेत. पण ईडीने राज्य सरकारविरोधात कोर्टात हा विषय उपस्थित करून आम्हाला या प्रकरणाचा तपास अधिक खोलात जाऊन करायचे असल्याचे सांगितले आहे.



आता आम्ही आमचा विषय लढतोय. त्यात आमचाच विजय होईल असा आम्हाला विश्वास आहे. कितीही संघर्ष करावा लागला तरी आम्ही लढत राहू. पण विषय एवढाच आहे की, कोडे कधी - कधी सुटत नाही. आज जे लोक सत्तेत आहेत, त्यांचाही विषय ईडी सोडत नाही हा फार मोठा प्रश्न आहे. आम्हाला असे कळले आहे की, हा विषय २६ जानेवारीला दिल्लीला गेला होता, तेव्हा दिल्लीने या प्रकरणात जे कुणी नेते असतील त्यांना अजिबात न सोडण्याचे सांगितले. त्यावरून या प्रकरणी केंद्र व राज्य सरकारमध्ये विरोधाभास असल्याचे स्पष्ट होते. आम्ही विरोधात आहोत. आम्हाला संघर्ष करावाच लागेल. पण जे सत्तेत आहेत, त्यांची उद्या अडचण होण्याची शक्यता आहे, असे ते म्हणाले.

(पान ४ वर)

# अजित पवारांच्या मृत्यू बाबत 'दाल में कुछ काला है'-विजय वडेट्टीवार

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अजित पवारांच्या विमानाचा ब्लॅकबॉक्स जळायच्या मुद्यावर संशय व्यक्त केला आहे. अजित पवारांच्या अपघाताविषयी वेगवेगळ्या शंकाकुशंका व्यक्त केल्या जात आहेत. या प्रकरणी ब्लॅकबॉक्स खराब झाला किंवा त्यातून काहीही माहिती प्राप्त होत नाही असे म्हटले जाते तेव्हा निश्चितच दाल में कुछ काला हैं असा संशय येतो, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांचे गत २८ जानेवारी रोजी बारामतीत झालेल्या एका विमान अपघातात मृत्यू झाला. तेव्हापासून या अपघाताविषयी संशय व्यक्त केला जात आहे. अनेक नेत्यांनी हा अपघात नसून, घातपात असल्याचा दावा केला आहे. त्यात आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची भर पडली आहे. विजय वडेट्टीवारांनी मंगळवारी या प्रकरणी बोलताना अजित पवारांचा मृत्यू अपघात वाटत नाही असा दावा केला. ते म्हणाले, अजित पवारांचा मृत्यू अपघाती आहे की घातपात आहे याविषयी देशभरात खूप चर्चा सुरू आहे. अजित पवारांचा मृत्यू हा काही अपघात वाटत नाही.

याविषयी ज्या काही शंका उपस्थित झाल्यात त्यात काही प्रमाणात तथ्य वाटते. ब्लॅक्सबॉक्स खराब झाला आहे किंवा त्यातून काही माहिती प्राप्त होत नाही असे समोर येते तेव्हा त्याचा अर्थ दाल में कुछ काला हैं असा लावला जातो, असे ते म्हणाले.

# हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी

## भाजपचा खोडसाळपणा म्हणत वक्तव्याचा अर्थही समजावला

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- राज्यात शिवजयंतीची जल्लोष आणि उत्साहात तयारी सुरू असून शिवप्रेमी, शिवभक्त तयारीला लागले आहेत. मात्र, दोन दिवसांपूर्वी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची तुलना शिवाजी महाराजांबद्दल केल्याच्या वक्तव्यावरुन चांगलाच वाद सुरू झाला. भाजप नेते, आमदारांकडून हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर टीका करत काँग्रेसचा खरा चेहरा हाच आहे, काही विशिष्ट समुदायाच्या व्होट बँकेसाठी हर्षवर्धन सपकाळ असं बोलतात असेही सत्ताधाऱ्यांनी म्हटले. मात्र, माझ्या वक्तव्याचा विपर्यास केला, भाजपने जाणीवपूर्वक खोडसाळपणा केल्याचं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. तसेच, आपल्या वक्तव्याने काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो, असेही सपकाळ यांनी म्हटले.

हर्षवर्धन सकपाळ यांनी शिवाजी महाराजांबद्दल गौरवोद्गार काढताना टिपू सुलतानच्या कार्याचेही कौतुक केले होते. तसेच, शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतानसोबत केल्याचं दिसून आलं. मात्र, भाजपने खोडसाळपणा करत चुकीच्या पद्धतीने माझे वक्तव्य पसरवल्याचे सांगत आपल्या वक्तव्याबद्दल हर्षवर्धन सपकाळ यांनी शिवप्रेमीप्रती केली दिलगिरी व्यक्त केली आहे.

दोन दिवसांपूर्वी हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना टिपू सुलतान सोबत केली या वक्तव्यामुळे राज्यभरात गदारोळ निर्माण झाला होता. त्यानंतर, हर्षवर्धन सपकाळ यांना धमक्याही मिळाल्या होत्या तर काही शिवप्रेमी थेट हर्षवर्धन सपकाळ यांच्या निवासस्थानी सुद्धा दाखल झाले होते. (पान ४ वर)

# टिपू सुलतान आणि महाराष्ट्राचा संबंध काय? त्याचा फोटो लावणे चुकीचे-दलवाई

रत्नागिरी दि.१७ (प्रतिनिधी)- काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानवरुन केलेल्या वक्तव्यावरुन वाद निर्माण झाल्यानंतर आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई यांनी प्रतिक्रिया दिली आहे. टिपू सुलतान आणि महाराष्ट्राचा संबंध नसताना त्याचा फोटो दालनात लावणं हे अत्यंत चुकीचं आहे असं हुसेन दलवाई म्हणाले. असं कृत्य करून काही लोक भाजपला मदत करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

राज्यात टिपू सुलतानच्या मुद्द्यावरून आता राजकीय वातावरण चांगलंच तापल्याचं चित्र आहे. आधी मालेगावच्या उपनगराध्यक्षांनी त्यांच्या दालनात टिपू सुलतानचा फोटो लावला. हिंदुत्वादी संघटना आणि भाजपने विरोध केल्यानंतर तो फोटो काढण्यात आला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळांनी टिपू सुलतानची तुलना थेट छत्रपती शिवाजी महाजारांशी केली. त्यानंतर मात्र या मुद्द्यावरून राजकारण तापल्याचं दिसून आलं.

या सगळ्या प्रकरणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हुसेन दलवाई यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, टिपू सुलतानचा फोटो दालनात लावणे हे अत्यंत चुकीचं आहे. असं कृत्य करून मुस्लिम समाजातली काही मंडळी ही (पान ४ वर)

# अजित पवारांच्या विमान अपघाताची सीबीआय चौकशीची मागणी

## सुनेत्रा पवारांसह शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आणि त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. त्यातून सावरत आता उपमुख्यमंत्री पदाची सूत्रे अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी हाती घेतली आहेत. इतर सर्व सुरळीत सुरू झाले असले तरी अजित पवारांचा अपघात होता की घातपात यावर अद्यापही शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्यातच सुनेत्रा पवार यांच्यासह राष्ट्रवादीच्या इतर नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. याबद्दल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माहिती दिली आहे.

अजितदादांच्या विमान अपघाताची चौकशी सीबीआयमार्फत केली जावी, अशी मागणी करण्यासाठी आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली. प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले, मी स्वतः त्यानंतर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार अशा सर्वांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अजितदादांच्या अपघाती मृत्यू झाला त्याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिले आहे. या पूर्ण प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करावी, यशही मागणी आम्ही केलेली आहे. तसे निवेदन आम्ही दिलेले असल्याची माहिती तटकरे यांनी दिली आहे.

पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, निवेदनाची दखल घेत राज्य सरकार उद्या केंद्र सरकारकडे अजितदादांच्या अपघाती मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. तसा पत्रव्यवहार केला जाईल. मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडून तशी पावले उचलली जातील, असेही तटकरे यांनी यावेळी सांगितले आहे. त्यामुळे आता हे प्रकरण सीबीआयकडे गेले तर कोणती नवी माहिती समोर येते याकडे लक्ष असणार आहे.

# मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणातील अहवालात पार्थ पवारांना क्लिनचिट?

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळाप्रकरणी चौकशी समितीकडून क्लीन चिट देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणात पार्थ पवार यांना मोठा दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. या जमीन व्यवहार प्रकरणात पार्थ पवार यांची स्वाक्षरी नसल्याने जमीन खरेदीशी त्यांचा थेट संबंध नाही, असा निष्कर्ष याप्रकरणाच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या विकास खरगे यांच्या समितीने काढला आहे. त्यामुळे पार्थ पवार यांना अभय मिळाल्याचे सांगितले जात आहे. विकास खरगे यांच्या समितीने जमीन व्यवहाराशी संबंधित कागदपत्रांची छाननी, महसूल विभागातील नोंदींची तपासणी तसेच संबंधित अधिकारी आणि पक्षकारांचे जबाब नोंदवलेत. या अहवालात जमीन हस्तांतरण प्रक्रिया, झोन बदल, नोंदणीतील त्रुटी तसेच महसूल अधिकाऱ्यांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती देण्यात आल्याचे समजते.

या जमीन (पान ४ वर)

# राज्य सरकारने अजितदादा अन् माझी केस थांबवायला सांगितली, पण सोडू नका अशा सूचना दिल्लीतून ईडीला आल्या, रोहित पवारांचा दावा

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- ''माझी जी ईडीची केस आहे, त्या बाबत सेशन कोर्टमध्ये हजेरी होती. माझी जी केस आहे, त्यात अजितदादांची केस पण आहे. इतरं नेत्याचीही केस आहे. या केसमध्ये बँकेचा विषय आहे, कुठेच काही चुकीचं झालेलं नाही. ईओडब्ल्यूने ईडीला सांगितलं आमच्यासाठी हा विषय संपलेला आहे. पण ईडीला हा विषय सोडायचा नाहीय. २६ जानेवारीला हा विषय दिल्लीला गेला. दिल्लीतून या प्रकरणात असलेल्या नेत्यांना सोडू नका अशा सूचना आल्या आहेत. या १३ तारखेला कोर्टात ईडीने राज्य सरकार विरोधात विषय मांडला. आम्हाला या विषयात अजून खोलात जाऊन तपासा करायचा आहे. आम्हाला संघर्ष करायचा आहे, मात्र सत्तेत असलेल्यांना वाटेल आम्ही सुटलो असे नाही, आम्ही जिंकणार याचा विश्वास आम्हाला आहे'' असं रोहित पवार म्हणाले. ''कोड कधी,कधी सुटत नाही. जे लोक आता सत्तेत आहेत, ईडीकडे त्यांचा विषय आहे. पण त्यांचा विषयही आता ईडी का सोडत नाही? हा प्रश्न लोकांना पडलेला आहे. हा विषय जेव्हा दिल्लीत गेला होता, तेव्हा दिल्लीकडून सांगण्यात आलं, जे जे नेते आहेत, त्यांना सोडू नका. कुठेतरी राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात विरोधाभास वाटतो'' असं रोहित पवार माध्यमांशी बोलताना म्हणाले.

''विरोधात असल्यामुळे आम्हाला संघर्षच करायचा आहे. पण ज्यांना असं वाटते सत्तेत आहोत म्हणून आम्ही सुटलो. त्यांची उद्या मोठी अडचण होऊ शकते'' असं रोहित पवार म्हणाले. सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाबाबतही रोहित पवार बोलले. ''टीव्हीवरुन मला ही बातमी कळली. ज्या ३५ आमदारांनी सुनेत्राकाकींच नाव राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी पुरस्कृत केलं, त्यांचे आभार मानतो. त्याशिवाय त्या पक्षाचे ३२ ते ३५ पदाधिकारी, त्यांनी सुद्धा कागदावर सुनेत्राकाकींच नाव स्पष्टपणे लिहिलं. आमदार, पदाधिकारी सर्व सुनेत्राकाकींसोबत आहेत, मी त्या सर्वांच अभिनंदन करतो, आभार मानतो. सुनेत्रा काकी राष्ट्रीय अध्यक्ष झाल्या पाहिजेत'' असं रोहित पवार म्हणाले. (पान ४ वर)

# महादेव मुंडे हत्या प्रकरणी दोघांची 'नार्को', एकाची 'ब्रेन मॅपिंग' चाचणी

मुंबई दि.१७ (प्रतिनिधी)- संपूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेणाऱ्या बीडमधील व्यापारी महादेव मुंडे खून प्रकरणात आता एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणाचा गुंता सोडवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने आता वैज्ञानिक चाचण्यांचा आधार घेतला असून, दोन संशयितांची 'नार्को' तर एकाची 'ब्रेन मॅपिंग' चाचणी केली जाणार आहे. या चाचण्यांमुळे गेल्या दोन वर्षांपासून रखडलेल्या तपासाला नवी दिशा मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एसआयटीने या प्रकरणाचा तपास हाती घेतल्यापासून अत्यंत गोपनीयता पाळत तपासाची चक्रे फिरवली आहेत. गेल्या सहा महिन्यांत सुमारे २०० लोकांची कसून चौकशी करण्यात आली असून ५०० हून अधिक व्यक्तींचे कॉल डिटेल्स तपासले गेले आहेत. याव्यतिरिक्त १२ जणांची मानसशास्त्रीय तपासणीही करण्यात आली आहे. यापूर्वीच या प्रकरणातील तीन महत्त्वाच्या साक्षीदारांची नार्को चाचणी पूर्ण झाली असून, आज उर्वरित तीन संशयितांपैकी दोघांची नार्को आणि एकाची ब्रेन मॅपिंग चाचणी केली जात आहे. या चाचण्यांचे अहवाल आल्यानंतर या हत्येमागचे नेमके कारण आणि सूत्रधार कोण, याचा उलगडा होण्याची चिन्हे आहेत.

# सातत्यपूर्ण पाठबळ हवे

आयटी क्षेत्रासाठी यंदाचा अर्थसंकल्प सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना यामुळे हे क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनामध्ये आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल.

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे. देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरते, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत. कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे. १९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनॅलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणारे आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण. सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येते, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो. यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे. स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे.

आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते. यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत यांचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे.

अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो. कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

# हे भारतातच घडू शकतं...

**मी** इटलीमधल्या तुरीन इथे बौद्धिक संपदा कायद्यात एलएलएम करत होते, तेंव्हाची गोष्ट आहे, २०१३ सालामधली. दिवसवसभराच्या लेक्चर्सने डोकं आंबून गेलं होतं, तेंव्हा एलिझा- आमची प्रोग्राम डिरेक्टर -वर्गात आली. ' माझ्याकडे इथं होणाऱ्या चित्रपट महोत्सवाचे काही फ्री पासेस आहेत, कुणाकुणाला यायचंय बोला पटकन', ती म्हणाली. मी अज्जिबात वेळ न दवडता हात वर केला, आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी एलिझा आणि आम्ही चार पाच जण या चित्रपट महोत्सवाला निघालो. जाऊन पोचलो तर समजलं की तिथं आज जे चित्रपट दाखवले जाणार होते त्यात एक भारतीय चित्रपट होता. डायलन मोहन ग्रे या दिग्दर्शकाचा 'फायर इन द ब्लड' या नावाचा.

हा चित्रपट पाहून बाहेर पडले तेंव्हा मी आंतरबाह्य हादरलेले होते. या हादरण्याच्या आड दडलेलं होतं एक कौतुक आणि एक शरम. जगात केवळ औषधं परवडत नसल्याने झालेल्या करोडो गरीब आफ्रिकी लोकांच्या मृत्यूने मी हादरून गेले होते. त्यांच्या मदतीला धावून गेलेल्या सिप्ला या भारतीय कंपनीच्या डोंगराएवढ्या कामाबद्दल एक भारतीय असूनही, आणि औषधनिर्माणशास्त्राची प्राध्यापिका असूनही मला काडीचीही माहिती नव्हती, याची मला प्रचंड लाज वाटली होती. पण त्याचवेळी कौतुक आणि आदराने मन भरून आलं होतं. हा आदर होता गरीब लोकांना स्वस्त दरात औषधं मिळावीत म्हणून सतत धडपडत आलेल्या, त्यासाठी योग्य धोरण, कायदे ठरवत आलेल्या भारत सरकारच्या दूरदर्शी धोरणाबद्दल, त्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राह्यलेल्या भारतीय जनरिक औषध उद्योगाबद्दल, आणि त्यातल्या सिप्ला, डॉ. रेड्डीज, रॅनबॅक्सी या सारख्या औषध कंपन्यांबाबत.

त्या दिवशी महोत्सवाहून परत आले ती या विषयाचं भूत मानगुटीवर बसवून घेऊन. याबद्दल खोलात जाऊन वाचल्याशिवाय आणि माहिती करून घेतल्याशिवाय माझ्या जीवाला आता चैन पडणार नव्हती. सुदैवाने वाचण्यासारखं भरपूर काही उपलब्ध होतं. मुळात औषधनिर्माण आणि पेटंट हे दोन्ही माझ्या अभ्यासाचे विषय असल्याने वाचलेलं सगळं विनासायास समजत देखिल होतं. एक दिवस अचानक असं वाटायला लागलं की, ' अरे आपल्या देशातल्या वाईट गोष्टींना नावं ठेवण्यात आपण सगळे किती हिरिरीने पुढाकार घेतो. आपल्या देशातला भ्रष्टाचार, इथली रहदारी, अस्वच्छता, गरिबी याबद्दल आपण किती सतत तक्रार करतो, टीका करतो. मग आपल्या देशाने जगासाठी केलेल्या चांगल्या गोष्टीचा धिंडोराही आपण त्याच उत्साहाने पिटायला हवा, नाही का? त्यात आपण मागे का? कुणी तरी करायलाच हवं हे काम'. हा विचार डोक्याच्या एका कप्प्यात सतत सतत फेर धरून नाचत होता.

दरम्यान मी तुरीनहून भारतात परत आले, माझ्या दिनक्रमात अडकले, तरी हा विषय पिच्छा सोडत नव्हता. ' कथा अकलेच्या कायद्याची' या बौद्धीक संपदेवरील माझ्या स्तंभाचं लोकसत्तेत लिखाण सुरू झालं. या स्तंभाला मिळालेला प्रतिसाद अत्यंत सुखावणारा तर होताच. एक दिवस 'फायर इन द ब्लड' पाहून बसलेला धक्का, वाटलेली शरम आणि जाणवलेला अभिमान, सगळे जणू कट करून गोळा झाले, आणि माझ्याभोवती फेर धरून नाचत सांगू लागले, 'तूच सांग की ही कहाणी जगाला- तूच लिही' आणि माझ्याही नकळत मी आफ्रिकेत ' औषध औषध' म्हणत प्राण सोडणाऱ्या लाखो करोडो आफ्रिकन माणसांना वचन देऊन बसले - ' हो मी लिहीन'.

आणि मग सुरू झाला एक वेडं करणारा प्रवास. मिळेल तिथून, मिळेल त्या स्वरूपात, मिळेल ते वाचायला सुरुवात झाली. एक दिवस सिप्लाचे सर्वेसर्वा युसुफ हमीद यांचा ईमेल ॲड्रेस कुठून तरी मिळाला. तो बरोबर आहे की नाही हे सुद्धा मला माहित नव्हतं. आणि ते मुळीच उत्तर देणार नाहीत हे माहित असूनही ' मला तुमच्या कामावर असं असं पुस्तक लिहायचंय' असं कळवणारा ईमेल मी त्यांना धाडून मोकळी झाले. दुसऱ्याच दिवशी त्यांचं उत्तर आलं. पुढच्याच महिन्यात ते लंडनहून भारतात येणार होते आणि तेंव्हा मला भेटायला ये असं त्यांनी मला कळवलं होतं. मी हे वाचून प्रचंड खूश झाले आणि जोमाने कामाला लागले. आणखीन झपाट्याने वाचू लागले.

दरम्यानच्या काळात ते मुंबईत आले. माझं दोन तीनदा त्यांच्याशी फोनवर बोलणं झालं. दिलेल्या वेळेला त्याना फोन करूनही ते जर उचलू शकले नाहीत तर ते आठवणीने परत फोन करत आणि ' येस्स माय डिअर गर्ल ...टेल मी व्हॉट आय कॅन डू फॉर यू' असं प्रेमाने बोलायला लागून मला आश्चर्यचकीत करत असत.

शेवटी त्यांच्या भेटीचा दिवस ठरला. भेटीच्या वेळेच्या बरीच आधी पोचून मी मुंबई सेंट्रल स्टेशन वरून सिप्लाच्या जुन्या कार्यालयाकडे चालत निघाले तेंव्हा मनात प्रचंड उत्कंठा तर होतीच. पण मी प्रचंड बेचैन होते. डॉ युसुफ हमीद यांच्या सारखा केम्ब्रीज मधे शिकलेला ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध माणूस... अब्जाधीश....सिप्ला या भल्या मोठ्ठ्या औषध कंपनीचा सर्वेसर्वा! तो माझ्यासारख्या एका किरकोळ प्राध्यापिकेला भेटायला तयार झाला होता. आणि मी त्यांच्याशी नीट बोलू शकेन का या विचाराने माझ्या तळहाताला घाम फुटला होता...पाय लटपटत होते...छाती धडधडत होती. एकदाची शेवटच्या मजल्यावरच्या त्यांच्या भव्य कार्यालयात जाऊन पोचले. त्यांच्या कार्यालयात होते ते स्वत: आणि एमके हमीद- त्यांचे बंधू. लालसर गोरापान रंग, पूर्ण चंदेरी झालेले केस, तीक्ष्ण नजर पण बोलण्यात अत्यंत मार्दव असलेले माझ्या आजोबांच्या वयाचे डॉ. युसुफ हमीद. त्यांच्या व्यक्तीमत्वाला एक वलय होतं...आणि त्यांच्यासमोर बसल्या बसल्या ते मला जाणवू लागलं. त्यानी मजेशीर बोलून माझी चिंता एकदम दूर पळवून लावली आणि मग आमच्या गप्पा सुरू झाल्या. मला हे का लिहावसं वाटतंय असं त्यानी आधी समजून घेतलं. मग मी किती पाण्यात आहे हे जोखण्यासाठी त्यानी मला माझं या विषयातलं ज्ञान तपासून पाहणारे काही प्रश्न विचारले. आणि मी बरोबर उत्तरं दिल्यावर मग मला म्हणाले, ' हं...आता विचार'. आणि मी त्यांची मुलाखत घेऊ लागले.

उत्तरं देताना प्रत्येक गोष्ट त्यांना अगदी लख्ख आठवत होती. किती तरी औषधांच्या रासायनिक संरचना ते समोरच्या वहीत झरझर काढत होते. मधनंच ' रोझीऽऽऽरोझीऽऽऽऽ' अश्या मोठमोठ्याने हाका मारत आपल्या सेक्रेटरीला कुठला तरी शोधनिबंध, वृत्तपत्रातला एखादा लेख, एखादं पुस्तक आणायला लावत होते. जेवायची वेळ झाली. त्या दिवशी प्रत्यक्ष डॉ. युसुफ हमीद याच्या पंगतीला बसून जेवण्याचा मान माझ्या नशिबात होता. जेवणं आटपून कॉफी पीत पीत आमची मुलाखत परत सुरू झाली. त्या दिवशी संपली नाही म्हणून दुसऱ्या दिवशीही चालू राह्यली. बोलण्याच्या ओघात मी ज्या लोकांशी बोलायला हवं अश्या किती तरी लोकांची नावं ते मला सांगत होते आणि मी लिहून घेत होते. मुलाखत संपवून मी नाशिकला परत आले तेंव्हा मी खरोखर थक्क झाले होते. डॉ. हमीद यांच्या ज्ञानी, मृदू हुशार व्यक्तीमत्वाने दीपून गेले होते.

दोनच दिवसात त्यांच्याकडून एक खोकं भरून पुस्तकं, सीडीज, वृत्तपत्रीय लेख माझ्या घरी येऊन पोचले. त्यानंतर त्यानी सांगितलेल्या या लढ्यातल्या शिलेदारांना शोधून काढून त्यांच्याशी संपर्क करण्याचा माझा उद्योग सुरू झाला. ही मंडळी जगभर पसरलेली होती.

मी राजहंसच्या दि. ग. माजगावकरांना पुस्तकाची कल्पना कानावर घातली आणि त्यांनीही पुस्तक करायला आनंदाने होकार दिला. देशोदेशी पसरलेल्या माझ्या कहाणीच्या नायकांचा शोध घेण्यात गुंतून गेले.

विशेष उल्लेख करीन तो न्यू यॉर्क टाइम्स वृत्तपत्रात आरोग्य विषयक लिखाण करणारे पत्रकार डोनाल्ड मॅकनील यांचा. डोनाल्डने मला आतोनात मदत केली. डॉ. हमीद यांचं काम सगळ्यात आधी जगाच्या नकाशावर जाहीरपणे आणलं ते डोनाल्डने- न्यू यॉर्क टाईम्समधे याबाबत लेख लिहून.

मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं द्यायला डोनाल्डने मला मोठमोठे ईमेल्स लिहिले, दुसऱ्याना फोनवर दिलेल्या मुलाखती मला पाठवल्या, स्वत: लिहिलेलं काही लिखाण पाठवलं...आणि इतर किमान पन्नास लोकांशी माझ्या ओळखी करून दिल्या. या सगळ्यांची मी आजन्म ऋणी राहीन.

तुरीनला असताना जी कहाणी ऐकून मी प्रचंड अस्वस्थ झाले होते, हलले होते, ती कहाणी या सगळ्या मंडळींबरोबर जणू पुन्हा एकदा जगले. त्या कहाणीचा एक भाग झाले. या सगळ्यांशी बोलताना, या बद्दल लिहिताना अनेकदा फार भावनिक व्हायला झालं. ही कहाणी लिहिताना औषधनिर्माणशास्त्राची एक प्राध्यापक आणि आजन्म विद्यार्थिनी म्हणून माझी सामाजिक बांधिलकी काय आहे याची लख्ख जाणीव मला झाली. ती जाणीव माझ्या विद्यार्थ्यांमधे यावी म्हणून मी फार विचारपूर्वक प्रयत्न करू लागले.

या विषयातली सगळी तांत्रिक माहिती लिहायची, पण ती सामान्य माणसाला समजली पाहिजे, त्यासाठी ती कादंबरीसारख्या फॉर्ममधे कशी लिहिता येईल, हे एक मोठंच आव्हान होतं.

सामान्य माणूस महाग औषधं घेत राहतो आणि पिळवटला जातो. हे थांबवण्यासाठी भारतीय पेटंट कायद्यात फार उत्तम सुविधा आहेत. त्यावर जगभरातून, विशेषतः अमेरिका आणि युरोपातून प्रचंड टिका होते, भारतावर प्रचंड दबाव आणला जातो. पण आपलं सरकार बधत नाही. आमच्या जनतेचं आरोग्य तुमच्या पेटंटसपेक्षा जास्त महत्वाचं आहे हे ठणकावून सांगत राहते. रेडक्रॉस, डॉक्टर्स विदाउट बॉर्डर्स सारख्या सेवाभावी संस्थांना गरीब देशात काम करण्यासाठी ीपळपस स्वस्त पण उत्तम दर्जाची औषधं भारत पुरवत राहतो. पण त्याचबरोबर अमेरिका आणि युरोपसारख्या दर्जाबाबत अत्यंत जागरूक असणाऱ्या देशांचाही सगळ्यात मोठा निर्यातदार बनतो. भारत हे कसं करू धजावतो हे जाणून घेण्यात इतर देशातल्या लोकांना प्रचंड रस असतो. आर्जेन्टिना, इंडोनेशियातले लोक जेंव्हा येऊन सांगतात की 'सामान्य नागरिकांना औषधं स्वस्तात मिळावी म्हणून काय करायचं हे भारताने आम्हाला शिकवलंय आणि तुम्ही दाखवलेल्या रस्त्यावर आम्ही चालतोय', तेंव्हा ऊर अभिमानाने भरून येतो.

सगळ्या जगाची फार्मसी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताच्या औषधनिर्माण उद्योगाचा आपण एक लहान बिंदू इतका छोटा भाग आहोत या विचाराने फार कृतार्थ वाटतं! आणि म्हणूनच हे ऋण फेडण्यासाठी माझ्यासारख्या या बिंदूने केलेला एक छोटासा प्रयत्न, उचललेला एक खारीचा वाटा, म्हणजे अशीही एक झुंज हे पुस्तक आहे. भारताबद्दल अभिमान वाटण्याचे आणखी एक कारण हे पुस्तक वाचकांना नक्की देईल याची मला नुसती आशा नव्हे तर खात्री वाटते!

-मृदुला बेळे

# २५ मिनीटाचा 'णमो आयरीयाणं' या मंत्राचा सामुहिक जाप करून आचार्य परमेष्ठी प्रती कृतज्ञता व्यक्त

१५ फेब्रुवारी रवीवार रोजी ऐतीहासिक मराठवाड्याची राजधानी असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील रामलीला मैदानावर साजरा करण्यात आला.हा अध्यात्मीक सोहळा पाहण्यासाठी राज्यभरातील हजारो गुरू भक्त राम लीला मैदानावर एकत्रितपणे आले होते.सकाळी सिडको वाले बडे बाबा चरणी पंचामृत अभिषेक करण्यात आला.शांति धारा करण्याचे सौभाग्य श्री अजीत प्रेमचंद सांगोले परिवार पुणे निवासी तथा द्वितीय शांती धारा करण्याचे सौभाग्य श्री अतुलजी शहा परिवार चंदु काका सराफ यांना प्राप्त झाले आचार्य आर्यनंदि महाराज यांचे पवीत्र १०८ कळसाने पाद प्रक्षालन करण्यात आले, त्यांनंतर जैन मंदिर ते रामलीला मैदान अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत पाच सुशोभित रथा मध्ये सौ सुमंगला भास्करराव अन्नदाते, मुख्य सर्वाथ सिध्दी रथात व सौ पल्लवी शेखर वायकोस, अक्षय चंद्रकांत खुळे, सौ अरूणा दगडुजी संगवे,सौ सोनाली अनिल क्षीरसागर सौ सीमा नथ्थुजी वायकोस मुख्य पाच इंद्र इंद्रायणी विराजमान होते,हे पाच रथ मिरवणूकीत मुख्य आकार्षण ठरले.रथा समोर पाच घोडेस्वार होते बैड पथकांच्या तालावर तरूणांनी चांगला आनंद घेतला.

मीरवणुक रामलीला मैदानावर पोहचल्यावर धर्म ध्वजारोहण मा श्री जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त,,मा श्री रोहित रमेश घोडके उप आयुक्त आयकर विभाग मुंबई,मा श्री लक्ष्मीकांतजी कटके उद्योजक यांच्या शुभ हस्ते करण्यात आले यावेळी श्री गणेशजी नावंदर नगर सेवक, श्री विश्वनाथ स्वामी नगर सेवक, श्री राजगौरव वानखेडे नगरसेवक, श्री अमोल मोगले अध्यक्ष श्री वर्धमान वायकोस श्री प्रकाश भाकरे श्री रविंद्र सांगोले श्री बाहुबली धोंगडे राजकुमार कुरकुटे, श्री विलास जोगी श्री महावीर पाटणी यांची उपस्थिती होती.

सभामंडपाचे उद्घाटन श्री सुनील बालाजी जैन, श्री प्रेमचंद जगजीवन, श्री संजयजी सोवितकर, श्री किशोर नाकील, यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. दिप प्रज्वलन श्री दिलीपजी घेवारे अध्यक्ष अखिल दिगंबर सैतवाळ जैन संस्था, श्री अमोल मोगले श्री प्रकाश भाकरे, श्री वर्धमान वायकोस,सौ तेजस्विनी संतोष जैन नगराध्यक्षा उमरखेड,सौ.निता महावीर वायकोस, श्री ओमप्रकाश मुळजकर परळी,श्री अनिरुद्ध माद्रप नांदेड,श्री भाऊसाहेब काळे परभणी आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मंगलाचरण सौ कन्नगी जैन नृत्य बोधी स्कूल च्या संचालिका यांनी आपल्या शिष्यासह कथ्थक नृत्याने केले. अतीशय सुंदर भाव युक्त विलोभनीय नृत्याने सर्व उपस्थीत जनसागराने टाळ्याच्या गजरात दाद दीली. कला



श्री संगीत एकेडमी चे विक्रांत वसंतराव वायकोस यांच्या शिष्यांनी सुध्दा विशेष कथ्थक सादर केले भक्तांबर स्तोत्र च्या विलोभनीय प्रस्तुती ने उत्साहाचा सर्वोच बिंदू गाठला.

महाराष्ट्रातील लोककला भारूड या कलेला जोपासण्याचे कार्य हे स्वर्गीय भारूडकार निरंजन भाकरे यांचा वसा आजही चालवीत आहे असे त्यांचें सुपुत्र युवा भारुडकार शेखर जी भाकरे यांनी आचार्य श्री आर्यनंदि महाराज यांचं भारुड सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली आचार्य श्री चा ईतीहास भारुडा द्वारे समाजाला सांगीतला आणी आचार्य श्री प्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. प्रस्तुती ने सर्वांचे डोळ्याचे पारणे फिटलं. यावेळी खालील सर्व प्रमुख उपस्थित मान्यवरांचे स्वागत आयोजकांच्या वतीने करण्यात आले. या वेळी अमोल पुर्णेकर, सुधाकर क्षीरसागर, राजेशजी फडकुले,अनिल मेहेत्रे, मुकेश साहुजी,कुमार नवले,प्रकाश ठोळे,रमण साहुजी, साईनाथ तोंगलकर, प्रमोद डेरे,विजय लुंगाडे, नितीनजी नखाते यांची प्रमुख उपस्थिती होती. हा सोहळा महामहोत्सव रथयात्रा हे एक निमित्त आपल्या सगळ्यांच्या साठी आहे.दिगंबर जैन समाजाला एकत्रित करण्यासाठी जे कार्य आर्यनंदि महाराज यांच्या कार्याची स्वप्नांची पुर्ती करण्याचा विडा मुनिश्री प्रभावसागरजी महाराज यांनी उचलला आहे आणी त्या साठी मुनिश्री सांगतील त्याप्रमाणे आपण सर्व कार्य पूर्ण करण्यासाठी दिगंबर जैन एकत्र येऊन हे स्वप्न पुर्ण करूया.समाजाच्या उत्कर्ष कसा होईल त्यासाठी काय करावं लागेल हे सर्व तुमच्या पर्यंत पोहोचनार आहे तुमच्या मोबाईल मध्ये एक लिंक वरुन आपण या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन अमोल मोगले यांनी केले तसेच या कार्यक्रमासाठी ज्यांनी सहकार्य केले आहे त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष दिलीपजी घेवारे यांनी समाजाला संबोधित करतांना ज्यांनी आम्हाला लोखंडाला परिसस्पर्श केला आणी आमचं सोनं झालं तरी आम्ही त्यांनी दाखवीलेल्या मार्गाने चाललो कां आत्म चिंतन करा आपण गुरू देवांच्या उपकाराची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एकत्र आलोय पण नेमकी गर्दी सभागृहात पाहीजे ती गर्दी कुठे आहे भोजन गृहात याची खंतही त्यांनी व्यक्त केली आमच्या गुरू देवांना दोन तीन दिवस अंतराय होतो तरी ते शांत प्रसन्न परीणाम ठेवून धर्मरत राहतात आम्ही मात्र दोन तास मंडपात बसु जर शकत नाही तर धर्म प्रसार धर्माच पालन कसं काय करणारं एकत्र या संघटीत व्हा धर्माचे पालन करा नियम पालन करा असा संदेश दिला आणी कार्यक्रमाचं आयोजन सुंदर केले त्या बद्दल आयोजकांच अभिनंदन केले. महावीर पाटणी यांनी आचार्य पवीत्रसागरजी गुरूदेवांच्या कार्याची व प्रभावसागरजी गुरूदेवांच्या कार्याची प्रशंसा केली आणी आचार्य आर्यनंदि महाराज यांच्या कार्याची माहिती दिली व त्यांच्या कार्याची परंपरा कायम ठेवण्याचे कार्य उपाध्याय जयभद्रजी महाराज यांच्या नंतर कुणी पुढें नेत आहेत तर ते फक्त हे पवीत्रसागरजी आणी त्यांचा संघ संस्कार देणार्या पाठशाळे साठी जे कार्य सुरू आहे त्यांचं हेच कार्य दिगंबर जैन धर्माची पताका फडकावीत राहील आचार्य श्री आर्यनंदि महाराज यांच्या चरणी विनम्र विनयाजंली अर्पण केली.

मा श्री जितेंद्र पापळकर विभागीय आयुक्त यांनीही तीर्थ रक्षा शिरोमणी आचार्य श्री आर्यनंदि महाराज यांच्या अंतीम समयी आशीर्वाद घेण्याचं सौभाग्य लाभले समाजा साठी जे काही करता येईल ते करण्यासाठी मी प्रयत्न करीतच असतो गुरू सेवा धर्म सेवा राष्ट्र सेवा ही करायलाच पाहीजेत समाजानं संघटीत होणे ही एक गरज आहे सर्वांनी वात्सल्य भाव ठेवणं गरजेचं आहे असं मत व्यक्त केले आचार्य श्री आर्यनंदि महाराज यांच्या रजत समाधी महोत्सव निमीत्त तसेच आज संपुर्ण आचार्य परमेष्ठी बद्दल आपली विनयाजंली अर्पण केली.

आचार्य श्री पवीत्र सागरजी महाराज यांनी आपल्या प्रवचनात आर्यनंदि महाराज हे काही फक्त सैतवाळ जैन समाजाचे नव्हते तर सकल दिगंबर आणी जैनेतर समाजाचे ही होते.

हे अनेक प्रसंगातून उपस्थित जनसागराला सांगीतले त्यांच्या कार्याची माहिती विस्तृत विवेचनातुन प्रकट केली व त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आणी मतभेद असतात मन भेद नको समाज उन्नती साठी एकत्र या आचार्य श्री आर्यनंदि महाराज यांना जे अपेक्षित होते ते स्वप्न आपण पूर्ण करू या असे कथन करून यांच्या कृतज्ञता व्यक्त केली. प्रभावसागरजी महाराज यांनी आपले सुप्त गुण शक्ती ओळखा व समाजाच्या कल्याणासाठी एकत्र या अशी साद दिली सर्वांशी वात्सल्य भाव ठेवणं गरजेचं आहे सर्व आचार्य परमेष्ठी प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी २५ मीनीटाचा ' आहे या णमो आयरीयाणं ' या मंत्राचा सामुहिक जाप करण्यात आला हा जाप सर्व अहिंसावादी धर्मीयांनी करावा असं आव्हान ही केलं होतं छत्रपती संभाजीनगर च नव्हे तर संपूर्ण भारतभर या मंत्राचा जाप जैन जैनेतर बंधु भगिनी श्रावक श्रावीका युवक युवतींनी केला.

महा महोत्सवाला पालक मंत्री श्री संजय शिरसाठ महाराष्ट्र राज्याचे मंत्री श्री अतुलजी सावे आमदार श्री प्रदिपजी जैस्वाल आमदार श्री संजयजी केणेकर, खासदार श्री भागवतजी कराड महापौर समीरजी राजुरकर यांच्या सह महापालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवक नगरसेविका यांनी सदिच्छा भेट देऊन शुभेच्छा दिल्या सर्व मान्यवरांचे यथोचित सन्मान आयोजक कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाळ दिगंबर जैन मंदिर चे वतीने करण्यात आले.

कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अमोल मोगले वर्धमान वायकोस निलेश सावळकर प्रकाश भाकरे रविंद्र सांगोले शेखर वायकोस बाहुबली धोंगडे राजकुमार कुरकुटे बाहुबली बोपलकर प्रकाशजी दलाल प्रकाश धुमाळ अनील बुर्से डि एच वायकोस जीवंधर कोरडे संजय उदगीरकर विजय म्हेत्रे यांच्या सह संदेश अन्नदाते, अशोक वायकोस ,स्वप्नील अन्नदाते,सागर बुजुर्गे दिगंबर क्षीरसागर प्रवीण गोसावी सौ सवीता गोसावी सौ मंगला क्षीरसागर सौ मंजुषा सिंगलकर सौ लता महाजन सौ दर्शना संघवी सौ वैशाली सांगोले सौ संजीवनी बाळशेटे सौ सारीका दलाल सौ मीना आहेरकर सौ शैलजा सांगोले सौ लता अन्नदाते उन्नती महिला मंडळ,स्वस्ती महिला मंडळ,णमो महिला मंडळ, प्रगती महिला मंडळ, बहु मंडळ,अर्हम महिला मंडळ, चे सर्व कार्यकर्ते यांनी प्रयत्न केले.

समारोप डॉ मेधा लखपती यांच्या अहिंसा गीताने करण्यात आले मेधा लखपती यांच्या सुश्राव्य आवाजाने सर्व मंत्र मुग्ध झाले होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन नितीन नखाते यांनी शब्दबद्ध केले आणी आभार प्रदर्शन अमोल मोगले यांनी केले कार्यक्रमाचे मार्गदर्शक विलास जोगी यांनी विविध ठिकाणांहून आलेल्या सर्व पाहुणे मंडळी चे विशेष आभार व्यक्त केले कार्यक्रमाला जवळपास आठ ते दहा हजार भाविक उपस्थित होते सर्वांना सनातन दिगंबर जैन समाजाचे वतीने महाप्रसाद देण्यात आला.

# दक्षता समितीच्या आदेशानुसार बोर्ड परीक्षेतील गैरप्रकार प्रकरणी १८ जण निलंबित

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेसाठी शिक्षण विभागाची ठोस कारवाई दक्षता समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी श्री दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर श्री अंकित आणि विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री अनिल साबळे यांच्या आदेशानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सुरू असलेल्या इयत्ता १२ वीच्या बोर्ड परीक्षेदरम्यान घडलेल्या गैरप्रकार प्रकरणी तात्काळ आणि कठोर कारवाई करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील राष्ट्रीय चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जेवपूर, ता. कन्नड येथील परीक्षा केंद्रावर गैरप्रकार झाल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. छत्रपती संभाजीनगर, श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या दिनांक १० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या आदेशानुसार सखोल चौकशी करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेज तसेच अधिकृत अहवालांच्या आधारे संबंधित परीक्षा केंद्रावर कर्तव्यावर असलेल्या काही शिक्षक व सेवक यांनी परीक्षा नियमांचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले.

चौकशीअंती सेवा नियमांनुसार पुढील १८ जणांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे : निर्मळ भगवान, नथू सातदिवे, सचिन रामदास, नरेश भागिनाथ सोनवणे, श्रीमती छाया नरसिंग मुंगे, बळीराम कचरू राठोड, श्री आर. के.डरे, संतोष रावसाहेब लिहिणार, अनंता बळवंत गाढेकर, करणसिंग हुमुकसिंग चंदवाडे, दीपक कैलास सोनवणे, बाळकृष्ण श्रावण साळवे, संजय कारभारी कडवे, संतोष पंढरीनाथ भिंगारे, संजय धर्मराज दाभाडे, पी. सी. आव्हाळे, ऋषिकेश वसंतराव पाटील, राधा एकनाथ पेरे, एस. टी. घुगे (सेवक).

निलंबन आदेशानुसार संबंधित कर्मचारी निलंबन कालावधीत मुख्यालय सोडू शकणार नाहीत. त्यांना नियमानुसार निर्वाह भत्ता देण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी किंवा इतर सेवा स्वीकारण्यास मनाई करण्यात आली आहे.

मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांनी स्पष्ट केले आहे की परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, शिस्त आणि प्रामाणिकता अबाधित ठेवणे ही विभागाची सर्वोच्च जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारास कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही.

खाजगी संस्थांमधील संबंधित कर्मचाऱ्यांवरही नियमांनुसार निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, पुढील प्रशासकीय कार्यवाही नियमानुसार काटेकोरपणे राबविण्यात येणार आहे. सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परीक्षा नियमांचे प्रामाणिकपणे पालन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# लव्ह ट्रॅप, छळ आणि धर्मांतर! २५ वर्षांत भारत इस्लामिक स्टेट होईल... अंगावर शहारे आणणारा 'द केरळ स्टोरी २' चा वादग्रस्त ट्रेलर आऊट

२०२३ मध्ये बॉक्स ऑफिसवर वादळ निर्माण करणाऱ्या 'द केरळ स्टोरी' या चित्रपटानंतर आता निर्मात्यांनी याच्या सीक्वेलची घोषणा केली आहे. 'द केरळ स्टोरी २' (The Kerala Story 2) चा अंगावर शहारे आणणारा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून, यात कथेची आणखी एक भीषण आणि गडद बाजू मांडण्यात आली आहे. चित्रपटाची कथा सत्य घटनांपासून प्रेरित असल्याचे निर्मात्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे. विविध राज्यांमधील हिंदू मुलींना लक्ष्य करून त्यांचे होणारे शोषण आणि सक्तीने केले जाणारे धर्मांतर, हा या सीक्वेलचा मुख्य विषय आहे. या चित्रपटात अभिनेत्री अदा शर्मा पुन्हा एकदा या संवेदनशील विषयात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. पहिल्या भागावर झालेल्या टीकेनंतरही या चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता, त्यामुळे आता या दुसऱ्या भागाबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

**'पुढील २५ वर्षांत भारत इस्लामिक स्टेट होईल...';**

'द केरळ स्टोरी'च्या यशानंतर आता या चित्रपटाचा सीक्वेल प्रेक्षकांच्या भेटीला येत असून, नुकत्याच प्रदर्शित झालेल्या



ट्रेलरने सोशल मीडियावर वादाला तोंड फोडले आहे. 'इन्शाल्लाह, पुढील २५ वर्षांत पूर्ण भारत एक इस्लामिक स्टेट असेल...' या अत्यंत वादग्रस्त आणि खळबळजनक संवादाने या ट्रेलरची सुरुवात होते, ज्यामुळे कथेतील संघर्षाची तीव्रता स्पष्ट होत आहे. ट्रेलरमध्ये राजस्थानमधील एका १६ वर्षीय हिंदू मुलीचे बळजबरीने धर्मांतर केल्याचे दाखवण्यात आले असून, तिचे कुटुंब पोलीस ठाण्यात 'पोक्सो' अंतर्गत तक्रार दाखल करण्यासाठी धडपडत असल्याचे दिसते. कथेचा पुढचा भाग मध्य प्रदेशाकडे वळतो, जिथे एका हिंदू तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिची फसवणूक केली जाते. विश्वासाचा फायदा घेऊन तिचे धर्मांतर करणे आणि त्यानंतर होणारे भीषण शोषण याचे चित्रण ट्रेलरमध्ये करण्यात आले आहे. धर्मांतर, विश्वासघात आणि शोषणाचे हे 'भीषण वास्तव' पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर मांडण्यासाठी निर्माते सज्ज झाले आहेत. सत्य घटनांवर आधारित असल्याचा दावा करणाऱ्या या चित्रपटामुळे पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

**चित्रपट कधी होणार रिलीज ?**

चर्चेत असलेल्या 'द केरळ स्टोरी २' चा ट्रेलर सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत असून, त्यातील तिसऱ्या कथेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. यावेळी कथा पुन्हा केरळच्या पार्श्वभूमीवर फिरते, जिथे एका मुस्लिम तरुणाने हिंदू तरुणीला 'लिव्ह-इन रिलेशनशिप'चा प्रस्ताव दिल्यानंतर उद्भवणारा संघर्ष दाखवण्यात आला आहे. जेव्हा तरुणी धर्मांतर करण्यास ठाम नकार देते, तेव्हा तिला कोणत्या भयानक छळाला सामोरे जावे लागते, याची अंगावर काटा आणणारी झलक ट्रेलरमध्ये दिसते. दिग्दर्शक कामाख्या नारायण सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटात उल्का गुप्ता, अदिति भाटिया आणि ऐश्वर्या ओझा या अभिनेत्रींनी मुख्य भूमिका साकारल्या आहेत. हा बहुचर्चित चित्रपट येत्या २७ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. पहिल्या भागाप्रमाणेच याही भागावर नेटकऱ्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. पहिल्या भागावर काही राज्यांनी बंदी घातली होती, तर काहींनी याला 'प्रचारकी' चित्रपट म्हटले होते. आता या दुसऱ्या भागातील 'धर्मांतर आणि शोषणाचे' चित्रण पुन्हा एकदा मोठ्या वादाला तोंड फोडण्याची शक्यता आहे.

# 'व्हॅलेंटाईन डे'ला चक्क शिक्षकाने विद्यार्थिनीला केले प्रपोज

सातारा, दि. १७ (प्रतिनिधी) – सातारा जिल्ह्यात कराड तालुक्यातील मलकापूर शहरात 'व्हॅलेंटाईन डे' ला शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना घडली आहे. इयत्ता नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनीला एका शिक्षकानेच 'प्रपोज' करून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. सदर प्रकरणी पीडित मुलीच्या फिर्यादीवरून कराड शहर पोलीस ठाण्यात संबंधित शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी मलकापूर शहरातील एका शाळेत नववीच्या वर्गात शिक्षण घेत आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

१४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास संबंधित शिक्षकाने विद्यार्थिनीला वर्गाबाहेर बोलविले होते. भीतीपोटी मुलगी तीन मैत्रिणींना सोबत घेऊन बाहेर गेली. परंतु शिक्षकाने इतर तिघींना वर्गात पाठवून पीडित मुलीला थांबवले आणि म्हणाला, 'मी तुला चार दिवस बोलवत होतो, तू का आली नाहीस? रात्री तीन वाजता व्हॉट्सॲपवर ऑनलाईन का असतेस? मी तुझ्यावर प्रेम करतो', एवढंच नाहीतर पीडित मुलीचा हात पकडल्याचा आरोप आहे.

**शिक्षकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

घाबरलेल्या मुलीने हात झटकून वर्गात धाव घेतली. ही घटना तिने मैत्रिणी व कुटुंबीयांना सांगितल्यानंतर कुटुंबीयांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. रविवारी कराड शहर पोलीस ठाण्यात शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शोभायात्रेत २१ कुमारीका व सौभाग्यवती विशेष कळस घेऊन कलिकुंड पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरचा वर्धापन उत्सव साजरा



छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – सिडको परिसरातील कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाळ दिगंबर जैन मंदिर चा वार्षिक महोत्सव निमित्त सकाळी शोभायात्रा काढण्यात आली शोभायात्रेत २१ कुमारीका व सौभाग्यवती विशेष कळस घेऊन सामील झाल्या होत्या.

ध्वजारोहण मा.श्री. राजेशजी सावळकर संचालक देवगीरी नागरी सहकारी बँक मा श्री रवींद्रजी संघवी तथा मा श्री महेशजी माळवदकर नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहणानंतर माजी मंत्री राजेंद्रबाबु दर्डा यांनी सदिच्छा भेट देऊन मार्गदर्शन केले आणी शुभेच्छा व्यक्त करतांना समाजाचे सहकार्यामुळेच मी तीन वेळा येथुन आमदार मंत्री झालो अशा भावनीक आठवणी ना उजाळा दिला भगवान पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. प्रथम अभीषेक करण्याचा सन्मान भाऊसाहेब काळे परिवार परभणी यांना प्राप्त झाला शांतीधारा करण्याचं सौभाग्य सुमनताई सांगोले तथा सौ.सुमंगलाताई भास्करराव अन्नदाते परिवारास प्राप्त झाला पुर्ण कलश अभीषेक ऋतुजा वृषभ जोगी यांना प्राप्त झाला अभीषेका नंतर पार्श्वनाथ विधान संगीतमय करण्यात आले.



यामध्ये मुख्य ईंद्राचा सन्मान सौ. सुमंगला ताई भास्करराव अन्नदाते, तथा इंद्र इंद्रायणी म्हणून सौ पल्लवी शेखर वायकोस, सौ सीमा नथ्थुजी वायकोस, अक्षय चंद्रकांत खुळे, सौ अरूणा दगडुजी संगवे,अनील दिगंबर क्षीरसागर यांना प्राप्त झाला.

आचार्य श्री पवीत्रसागरजी महाराज मुनिश्री प्रशांत सागरजी महाराज मुनिश्री प्रभावसागरजी महाराज मुनिश्री स्वात्मनंदी महाराज यांचे पाद प्रक्षालन रत्नाकरजी बाबुराव अन्नदाते परिवार यांनी केले तथा जिनवाणी भेट सौ.विद्या अविनाश काळे सौ उज्वला दिलीप काळे यांनी केली. आचार्य श्री चे संगीतमय पुजन सौभाग्यवती च्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला महाप्रसाद लाभार्थी श्री रवीराज नारायणराव बुबणे परिवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. विधान पुजन ला जय जिनेंद्र कला मंच चे मनोज जैन सांगली यांच्या संगीताने भक्ती ला वेगळी रंगत निर्माण केली. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी मंदिर विश्वस्त अमोल मोगले वर्धमान वायकोस निलेश सावळकर प्रकाश भाकरे रवींद्र सांगोले शेखर वायकोस बाहुबली धोंगडे प्रगती महीला मंडळ आर्यनंदि छात्रावास चे बाहुबली बोपलकर प्रकाशजी दलाल स्वप्नीलजी अन्नदाते संजयजी उदगीरकर विजय म्हेत्रे, अनील बुर्से, प्रकाश धुमाळ, डी एच वायकोस, जीवंधर कोरडे यांनी परिश्रम घेतले मा. श्री राहुल सोनवणे यांचे फार मोलाचे सहकार्य लाभले किर्ती स्तंभ स्वतः त्यांनी स्वच्छ केला त्या मुळे राहुलजी ची समाजात नवी प्रतिमा तयार झाली या कार्यक्रमाला बाहुबली वायकोस अशोक वायकोस मुकेश जैन साईनाथ तोंगलकर गजानन व्यवहारे अवीनाश गवळी रमेश घोडके लक्ष्मीकांत कटके श्रीधर घोडके रत्नाकर अन्नदाते संतोष सोनटक्के राजेंद्र क्षीरसागर विशाल जैन विलास गोसावी प्रदिप दलाल अजीत गोसावी दिगंबर क्षीरसागर कैलास बाळशेटे प्रमोद सिंगलकर दिपक खडके दिपक सिंगरे भगवानराव क्षिरसागर णमो महिला मंडळ मयुर पार्क उन्नती महिला मंडळ शिवाजी नगर अर्हम महिला मंडळ भाजी बाजार स्वस्ती महिला मंडळ पीसादेवी यांच्यासह हजारो श्रावक श्रावीका बंधु भगिनी युवक युवती ची उपस्थिती लक्षणीय होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अमोल मोगले यांनी व्यक्त केले.

# पुरोगामी महाराष्ट्राने केरळचा आदर्श घ्यावा - डॉ.हुलगेश चलवादी

**'लाडके विद्यार्थी' योजना राबवून शिक्षणाच्या कक्षा रुंदावण्याचे आवाहन**

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) – विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यातून राज्य सरकारने 'लाडके विद्यार्थी' योजना सुरू करून गोरगरिब, होतकरू तसेच सर्वसामान्यांसाठी उच्च शिक्षणाचे द्वार खुले करावे; असे आवाहन शिक्षण क्षेत्रातील जाणकार, बहुजन नेते, माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी यांनी रविवारी (ता.१५) केले. केरळ राज्याने सरकारी, सरकारी अनुदानित कला व विज्ञान महाविद्यालयांमधील पदविका अभ्यासक्रम पुर्णत : मोफत केला आहे. याच धर्तीवर राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारने सर्व शाखेतील पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य सुरक्षित करावे, असे आवाहन डॉ.चलवादी यांनी केले.

विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सरकार या योजनेच्या माध्यमातून प्रोत्साहन देईल. हेच पाऊल छत्रपती-फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राची नवी दिशा ठरवेल. सरकारने एससी-एसटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना आरटीईच्या माध्यमातून शिक्षणाचा अधिकार मिळवून दिला आहे. परंतु, केवळ आठवीपर्यंतच शिक्षण मोफत आहे. अशात गरजवंताच्या पुढील शिक्षणाची वाणवा होते. आर्थिक, मानसिक तनाव वाढत त्यांचे खच्चीकरण होतेय. क्रांतीज्योती महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाईनी पुण्यातूनच शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची मुर्हतमेढ रोवली होती. आरक्षण लागू करीत सर्वसामान्यांना शिक्षणाची कवाड उघडणाऱ्या छत्रपती शाहु महाराजांच्या विचारांचा वारसा चालवत महाराष्ट्राने सर्वांसाठी शिक्षण मोफत करावे, असे मत डॉ.चलवादींनी व्यक्त केले.

राज्यात इयत्ता ९ आणि १० वी मध्ये शिक्षण सोडणाऱ्या मुलांचे प्रमाण १२.६% आणि मुलींचे प्रमाण १०.३% एवढे आहे. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाच्या या आकडेवारीत २०२३-२४ च्या तुलनेत १ टक्क्यांची वाढ दिसून येते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात दरवर्षी हजारो विद्यार्थी आर्थिक अडचणींमुळे पदवी शिक्षणापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत महाराष्ट्र सरकारनेही कला,विज्ञान, वाणिज्य तसेच इतर महत्वाच्या शाखांसाठी टप्प्याटप्प्याने शुल्कमाफीचा निर्णय घेतला, तर सामाजिक न्याय, शैक्षणिक समतेचे लक्ष साध्य करता येईल. शिक्षणावरचा खर्च हा भार नसून भविष्यावरची गुंतवणूक आहे, हे केरळने दाखवून दिले आहे. महाराष्ट्रानेही या निर्णयाचे अनुकरण करून विद्यार्थ्यांसाठी ठोस पाऊल उचलण्याची हीच योग्य वेळ असल्याची भावना डॉ.चलवादी यांनी व्यक्त केली.

# छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव दिनानिमीत्त जी.जी. हॉस्पिटलतर्फे रक्तदान शिबीर

छत्रपती संभाजीनगर, दि. १७, (प्रतिनिधी) – जी.जी. हॉस्पिटल, सिडको, एन-६. व दत्ताजी भाले रक्तकेंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यामानाने छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव दिनानिमीत्त बुधवार, दि.१८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान करण्यासाठी रक्तदात्याचे वय वर्ष १८ ते ६५ पर्यंत पाहिज, किमान वजन ४५ कि, रक्तात हिमोग्लोबीनचे प्रमाण १२.५ % पेक्षा जास्त असावे, रक्तदान करण्यापुर्वी ४ तास अगोदर आहार घेतलेला पाहिजे, नजिकच्या काळात कुठल्याही प्रकारची मोठी शस्त्रक्रिया, कावीळ, मलेरिया सारखे आजार झालेले नसावेत, हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह असल्यास डॉक्टरांच्या सल्याने रक्तदान करावयाचे कि नाही हे ठरवले जाईल. रक्तदात्यांनी नियमीत रक्तदान केल्यास कोलेटोराल नियंत्रण राहुन हृदयरोगाचे प्रमाण अतिशय कमी होते, पेशींना चालना मिळते, ४८ तासांच्या आत नवीन रक्त तयार होते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते, भविष्यात याच रक्तदात्याला रक्ताची गरज पडल्यास त्यांना संपूर्णपणे मोफत रक्त दिले जाते, 'एक रक्तदाता ३ रुग्णांचे प्राण वाचवू शकतो' अशी माहिती या शिबीराचे संयोजक डॉ. विजय विटोरे (कान-नाक-घसा तज्ञ) यांनी दिली. रक्तदात्यांनी अधिक महितीसाठी जी.जी. हॉस्पिटल, जे.एन. ई.सी समोर, सिडको, एन-६, छत्रपती संभाजीनगर, मो. ७२६२८०५१३१ / ९३२४८७२३०४ वर संपर्क साधावा.

# पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे तीन दिवसीय प्रदर्शन व विक्री कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर, दि. १७ (प्रतिनिधी) – भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय (MSME) अंतर्गत एमएसएमई विकास कार्यालय व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना अंतर्गत तीन दिवसीय प्रदर्शनी व विक्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ही प्रदर्शनी दि. १६ ते १८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील पाटीदार भवन, जालना रोड येथे होणार असून, दररोज दुपारी १२.३० ते सायंकाळी ७.०० या वेळेत सर्वांसाठी खुली राहणार आहे.

**कारागीर व शिल्पकारांना सुवर्णसंधी–** या प्रदर्शनात पारंपरिक कारागीर व शिल्पकारांना त्यांच्या वस्तूंचे प्रदर्शन व थेट विक्रीची संधी मिळणार आहे. यात सुतार, अस्त्रनिर्माते, लोहार, सुवर्णकार, कुंभार, मूर्तिकार, मोची, चटई व झाडू निर्माते, बाहुली व खेळणी निर्माते, मालाकार आदींचा सहभाग असणार आहे. तसेच ब्रँड नोंदणी, बौद्धिक संपदा हक्क व त्याचे फायदे याबाबत तीनही दिवस विशेष मार्गदर्शन करण्यात येणार असून स्वयंरोजगार कार्यशाळाही आयोजित केली जाणार आहे.

**विविध संस्थांचा पाठिंबा–** या कार्यक्रमाला लघु उद्योग भारती, दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, मराठवाडा लघु उद्योग विकास संघ, चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, सीएसएमएसएस छत्रपती शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आदी संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

**उद्घाटन व मान्यवर उपस्थिती**

या कार्यक्रमाचे उद्घाटन रवींद्र साठे, सभापती, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांच्या हस्ते दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुलकुमार मिश्रा, सहायक संचालक, एमएसएमई विकास कार्यालय असणार आहेत. विशेष सहकार्य रुपेश आचारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांचे लाभले आहे. यावेळी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडो जर्मन टूल रूम, नॅशनल स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन आदी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**नागरिकांना आवाहन**

सर्व नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन पीएम विश्वकर्मा योजनेतील कारागीर बंधू-भगिनींच्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. अधिक माहिती व स्टॉल बुकिंगसाठी संपर्क ९५९९६३२१८६ /९१२१५९२९९५/ ८२९८६३२१४५

# वेरूळच्या शिरपेचात मानाचा तुरा, अथर्व विटेकर यांची गटविकास अधिकारीपदी निवड

**विजय चौधरी, छत्रपती संभाजीनगर –**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील अथर्व अनिता महेश विटेकर या तरुणाने पोलीस भरतीचा अभ्यास करता करता तीन वर्षात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत गटविकास अधिकारी वर्ग एक पदावर यश मिळवले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन अधिकारी होण्याची स्वप्न आणि तरुण उराशी बाळगतात. कुणाचे प्रयत्न यशस्वी होतात. तर अनेक तरुण - तरुणींना वारंवार प्रयत्न करूनही अपयशाचा सामना करावा लागतो. एक दोन नव्हे तीनदा प्रयत्न करून अथर्वने एमपीएससीच्या परीक्षेत गटविकास अधिकारी वर्ग एक पद मिळवले आहे. एमपीएससीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन खुलताबाद तालुक्यातील पहिला गटविकास अधिकारी वर्ग एक म्हणून अथर्व विटेकर यांचे हे यश अनेकांसाठी नक्कीच प्रेरणादायी आहे.

अथर्व चा जन्म १८ जुलै २००१ रोजी वेरूळ येथे झाला. त्याने प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेरूळ या शाळेत पूर्ण केले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण गुरुदेव संमतभद्र विद्यामंदिर वेरूळ शाळेत पूर्ण केले तर उच्च माध्यमिक शिक्षण श्री संत जनार्दन स्वामी उच्च माध्यमिक विद्यालय वेरूळ येथे तर कोहिनूर महाविद्यालय येथे पदवी प्राप्त केल्यानंतर शिक्षण सुरू असतानाच पोलीस भरतीची तयारी सुरू केली. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. पोलीस भरतीचा प्रयत्न करत असताना एस आर पी एफ २०१९ च्या भरती मध्ये तो उत्तीर्ण झाला. एसएससी जीडी कॉन्स्टेबल २०२१ चा पेपर देऊन उत्तीर्ण झाला. एमपीएससी लिपिक २०२३ मध्ये मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन तलाठी पद एक प्रश्नावरून हुकले. विस्तार अधिकारी जालना पदावर २०२३ रोजी प्रतीक्षा यादीत असताना जलसंपदा विभागात निवड झाल्यानंतर कागदपत्राच्या पडताळणीसाठी न जाता तो अभ्यासात रमला. पीएसआय फिजिकल परीक्षा २०२४ मध्ये उत्तीर्ण झाला. त्यानंतर राज्य कर निरीक्षक २०२४ मध्ये निवड झाली. राज्य कर निरीक्षक जीएसटी पदावर निवड झाल्यानंतर त्याने आपला अभ्यास सुरूच ठेवला. २०२४ मध्ये गटविकास अधिकारी वर्ग एक पदावर निवड झाली. सुरुवातीला अभ्यास सुरू करत असताना अनेक अडचणींना व समस्यांना तोंड



द्यावे लागले. त्या गोष्टींनी खचून न जाता अधिक जोमाने अभ्यासाला सुरुवात केली. सुरुवातीपासून पोलीस भरतीचा प्रयत्न करत असताना स्पर्धा परीक्षेमध्ये एमपीएससी परीक्षेचा फॉर्म भरत राहिला. परीक्षेत चांगले गुण मिळत मिळत अखेर गटविकास अधिकारी वर्ग एक पद संपादन करत अथर्व विटेकर याने खुलताबाद तालुक्यातील पहिला गटविकास अधिकारी वर्ग होण्याचा मान पटकावला आहे. तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये एमपीएससीच्या बारावी पूर्व परीक्षा पास चार मुख्य परीक्षा पास व एक मुलाखत दिल्यानंतर गटविकास अधिकारी वर्ग या उच्च श्रेणी पदावर त्यांची निवड झाली आहे. सुरुवातीला वेरूळ गावात अभ्यास केला. त्यानंतर दोन वर्ष छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन अभ्यास केला. दीड वर्ष पुणे येथे जाऊन अभ्यास व अभ्यासिकेतून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला.आपल्या यशाच्या रहस्याबाबत बोलताना अथर्व म्हणाला की, चांगली मार्गदर्शक मित्र, योग्य नियोजन आणि हातातले नोट्स योग्य वेळी योग्य वळण मिळाले. चांगले क्लासेस व मार्गदर्शक लाभले. त्यामुळे यश संपादन करता आले. या यशाबद्दल सांगतांना अर्थव विटेकर म्हणाले, रोज दहा तास अभ्यास, योग्य झोप, सात्विक जेवण व दोन वर्ष सोशल मीडियापासून दूर, छोटा मोबाईल वापरला. सातत्य राखून २०२२, २०२३, २०२४ या तीन वर्षातल्या सातत्यपूर्ण प्रयत्न करत राहिलो. तिसऱ्या प्रयत्नामध्ये अखेर गटविकास अधिकारी वर्ग एक पदावर निवड झाली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवा आशेचा किरण अथर्वच्या माध्यमातून निर्माण झाला आहे. स्वतःवर आत्मविश्वास, चुकातून शिकणे, जिद्द, चिकाटी, स्वतःच्या क्षमता ओळखणे महत्त्वाचे आहे. सध्याच्या घडीला नोकरी मिळवणे फारच कठीण झाले आहे. त्यात बरेच तरुण-तरुण अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून असतात. महाराष्ट्रात एमपीएससीमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसाठी मोठी स्पर्धा पाहायला मिळते. एमपीएससी मार्फत दररोज वर्षी हजारो पदांसाठी भरती केली जाते. यासाठी विद्यार्थी देखील अहोरात्र मिळत घेत असतात. मात्र यातही काहींना यश मिळते तर काहींच्या पदरी निराशा पडते. पण दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर डोंगराएवढ्या संकटांना भेदून यशाला गवसणी शक्य होते. याचेच एक उदाहरण पाहायला मिळाले. खुलताबाद तालुक्यातील वेरूळ येथील अथर्व अनिता महेश विटेकर याने एमपीएससी परीक्षेत तिसऱ्या प्रयत्नात यश मिळवले आणि गावकऱ्यांचा ऊर अभिमानाने भरून आला. खुलताबाद तालुक्यातील एमपीएससी परीक्षेत गटविकास अधिकारी वर्ग एक पद मिळवणारा अथर्व विटेकर याचा तसेच त्याच्या आई - वडिलांचे येथे सन्मान गावकऱ्यांनी केला.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

*जिल्हा रस्ता सुरक्षा समिती बैठक*

# अपघातप्रवण स्थळांबाबत ऑनलाईन भौगोलिकस्थान माहिती सेवांचा सहयोग घ्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- प्रवास करतांना इंटरनेट वरुन विविध भौगोलिकस्थान माहिती सेवांचा सहयोग प्रवाशांकडून घेतला जातो.

अशा सेवांचा सहयोग वाहनचालकांना मोबाईलवरुन अपघातप्रवण स्थळांबाबत पूर्वसुचना देण्याबाबत घ्यावा,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, अधीक्षक अभियंता एस.एस.भगत, कार्यकारी अभियंता एस.के. चव्हाण, एस.जी. केंद्रे, श्रीमती प्रिया पुजारी , पोलीस निरीक्षक महामार्ग विभाग गजानन जाधव आदी उपस्थित होते.

सेव्ह लाईफ फाऊंडेशन या संस्थेने सन २०२३-२४ मध्येकेलेल्या सर्व्हेक्षणाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात २०९ अपघातप्रवण स्थळे आहेत. जिल्ह्यात शून्य अपघात अभियान राबविण्याच्या दृष्टिने उपाययोजना राबविणे अपेक्षित असून त्यासाठी अपघातप्रवण स्थळांवरील अपघात प्रवणता निर्मूलन करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित सर्व विभागांनी संयुक्त प्रयत्न करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महानगरपालिका, आरोग्य विभाग, परिवहन विभाग, गृह विभाग, शिक्षण विभाग अशा सर्व विभागांनी संयुक्तपणे उपाययोजना राबवावयाच्या आहेत.

जिल्ह्यात नक्की करण्यात आलेल्या अपघातप्रवण स्थळांचे भौगोलिक अंकन करण्यात आले आहे. त्या अंकनाची माहिती भौगोलिक स्थान माहिती सेवा पुरविणाऱ्या संस्थांना द्यावी. त्यानुसार वाहन चालक वाहन चालवितांना या सेवांचा वापर करेल व रस्त्यात पुढे येणाऱ्या अपघातप्रवण स्थळाबाबत त्यास आगाऊ सुचना मोबाईल द्वारे दिली जाईल. हा संबंधित डाटा अशा संस्थांना देऊन त्या सेवांचा उपयोग अपघात टाळण्यासाठी करावा,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.




तसेच आवश्यक स्थापत्य उपाययोजनांबाबत सर्व्हेक्षण करुन त्याचे अंदाजपत्रक द्यावे. त्यात गतिरोधक तयार करणे, फलक लावणे, वाहन चालकाच्या रस्त्यातील दृष्यमानतेतील अडथळे दुर करणे, त्यासाठी रडार व्हेईकल वापरणे, अपघात झाल्यास वैद्यकीय उपचार देण्याचा कालावधी कमी करणे, सर्व संबंधित यंत्रणांचे प्रशिक्षण देणे, जनजागृती करणे इ. उपाययोजना सर्व संबंधित विभागांनी मिळून राबवावयाच्या आहेत,असे निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिले.

# राज्य अन्न आयोगाच्या पथकाकडून शासकीय गोदाम पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे व त्यांच्या पथकाने आज शासकीय गोदाम व अन्य संस्थांची पाहणी केली. तसेच शालेय पोषण आहार स्वयंपाक घर आदी ठिकाणीही भेटी देऊन पाहणी केली व प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार व पोषणमूल्य असलले अन्न पुरविले जाईल याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधितांना दिले.

राज्य अन्न आयोग सोमवार दि.१६ पासून जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. अध्यक्ष महेश ढवळे, सदस्य सचिव सुभाष राऊत, बबन मसाले यांच्या पथकाने आज शालेय पोषण आहार स्वयंपाक घर, इस्कॉन गोदाम, अन्न अमृत फाऊंडेशनचे मध्यवर्ती स्वयंपाकघर आणि शासकीय अन्न गोदामांना भेटी देऊन पाहणी केली. शालेय विद्यार्थ्यांसाठी शिजवण्यात येणाऱ्या अन्नाचा दर्जा, साठवणूक व्यवस्था आणि वितरणाची पारदर्शकता याबाबत बारकाईने तपासणी केली.

तपासणी दरम्यान श्री. ढवळे यांनी निर्देश दिले की,आहार शिजवतांना त्यात उच्च दर्जाच्या व चांगल्या गुणवत्तेच्या खाद्यपदार्थांचाच वापर करण्यात यावा. मुलांच्या आरोग्याशी तडजोड होता कामा नये असेही स्पष्ट सांगितले. त्यांनी सांगितले की, अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांनी आणि संस्थांनी अन्न सामुग्रीचा पुरवठा करतांना अन्न सुरक्षा मानके कायद्यानुसार्व अन्न पदार्थ्यांची अधिकृत प्रयोगशाळेतुन तपासणी करणे बंधनकारक असून केवळ उत्कृष्ट दर्जाच्या पदार्थांचाच पुरवठा केला जावा, असे सांगितले.



पाहणी प्रसंगी जिल्हा पुरवठा अधिकारी, शिक्षण विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# गंगापूर येथे विधी व सेवा महाशिबीर

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती व गंगापूर तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा शनिवारी (दि.१४) गंगापूर येथे पार पडला.




मेळाव्याचे उद्घाटन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय वाघवसे यांनी केले.अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायालय तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गिरीश अग्रवाल हे होते. जिल्हा न्यायाधीश आर.डी. पाटील, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एस.बी. बहाळकर, उप विभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे आदी उपस्थित होते.

धूत कन्या शाळा गंगापूर या प्रांगणात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाशिबिरात २०स्टॉल्स लावण्यात आले होते. त्यतून विविध शासकीय कार्यालयांमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती व सेवा उपलब्ध करण्यात आल्या. तसेच विविध सेवा व न्याय सहाय्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा न्यायाधीश वैशाली फडणीस यांनी कळविले आहे.

# गुंतवणूकदार, निर्यातदारांसाठी शुक्रवारी कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील गुंतवणूकदार, निर्यातदार व निर्यातक्षम उद्योग घटक यांच्यासाठी महानिर्यात इग्नाईट कव्हेंशन २०२६ चे आयोजन शुक्रवार दि.२० रोजी आयोजीत करण्यात आली आहे. ही कार्यशाळा बजाज भवन, सी आय एम ए सभगृह, पी-२, रेल्वे स्टेशन एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर येथे स्काळी ९ ते सायं. ५ यावेळात होणार आहे, असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक वय.आर सारणीकर यांनी कळविले आहे.

या कार्यशाळेत जिल्ह्यातील प्रमुख उद्योग क्षेत्राबबत चर्चासत्र, गुंतवणूकीच्य संधी, इतर क्षमता असलेल्या क्षेत्रातील गुंतवणूक व व्यवसाय संधीबाबत चर्चा, उद्योजकांचे अनुभव इ. बाबींचा समावेश आहे. जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री कक्ष, उद्योग संचालनालय, मुंबई सीडबी बँक, जिल्ह्यातील बँका, उद्योग संघटना, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मिटकॉन, कौशल्य विकास व रोजगार व जिल्ह्यातील संबंधीत शासकीय यंत्रणांचे प्रमुख आदी सहभागी होतील. तरी या कार्यशाळेस जिल्ह्यातील सुक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, शेतकरी सहकारी उत्पादक संस्था, प्रक्रिया उत्पादक उद्योग घटक, औद्योगिक संघटना यांनी उपस्थित रहावे,असे आवाहन महाव्यवस्थापक वाय.आर. सारणीकर यांनी केले आहे.

# महारेशीम अभियान २०२६: जनजागृती वाहनास हिरवा झेंडा

## जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांची ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड




छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- महारेशीम अभियानाच्या फिरत्या जनजागृती वाहनास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूणे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आज रवाना करण्यात आले. जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांनी ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली असून सहा खाजगी चॉकी/बाल अळी संगोपन केंद्र सुरू आहेत. जिल्ह्यात रेशीम उत्पादन वाढीसाठी विविध योजना राबविण्यात येत असून शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन रेशीम शेतीकडे वळावे असे आवाहन अपर जिल्हाधिकारी अडकुणे यांनी यावेळी केले.

**आपले सरकार पोर्टलवरुन नोंदणी सुविधा**

रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी 'महारेशीम अभियान- २०२६' राबविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग घोरण २०२३-२८ अंतर्गत रेशीम शेतीला केंद्रस्थानी ठेवत तुती लागवड व टसर रेशीम उद्योगासाठी शेतकरी उद्योजकांची नोंदणी, प्रचार व जनजागृती करण्याचा उद्देश या अभियानामागे आहे. अभियान काळात 'आपले सरकार' पोर्टलवरून नवीन शेतकरी व उद्योजक नोंदणीला विशेष प्रोत्साहन देण्यात येणार असून, रेशीम संचालनालयाच्या विविध सेवांची व्यापक प्रसिद्धी केली जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ११ मार्च पर्यंत अभियान राबविले जाणार आहे.

माजी रेशीम उपसंचालक दिलीप हाके,केंद्रीय रेशीम मंडळाचे विभागीय विस्तार केंद्राचे शास्त्रज्ञ अंकुश गाडगे, रेशीम विकास अधिकारी बी.डी.डेंगळे, प्रादेशिक रेशीम कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी रविंद्र सांगळे,लखाधिकारी पोपट चौधरी व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांऐवजी रेशीम शेतीला प्राधान्य दिल्यास अधिक व निरंतर उत्पन्न मिळू शकते. जिल्ह्यातील हवामान रेशीम शेतीस अत्यंत अनुकूल आहे. पारंपारिक पिकांना पर्याय म्हणून रेशीम शेती अनेक दृष्टीने फायदेशीर आहे. जालना व बीड येथे जवळच बाजारपेठ उपलब्ध आहे. रेशीम शेतीबाबत आवश्यक तांत्रिक कौशल्य आत्मसात करून प्रायोगिक तत्त्वावर शेती करावी व कमी कालावधीत सातत्यपूर्ण उत्पन्न देणाऱ्या रेशीम शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करून रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांनी यावेळी केले.

**११०० एकर नोंदणीचे उद्दिष्ट**

सध्या जिल्ह्यात १०७२ शेतकऱ्यांनी ११२२ एकर क्षेत्रावर तुती लागवड केली असून सहा खाजगी चॉकी/बाल अळी संगोपन केंद्र सुरू आहेत. त्याद्वारे रेशीम शेतकऱ्यांना सुरुवातीचे आठ ते दहा दिवस लहान अळ्याचे संगोपन करून पुरवठा केला जातो. तसेच दोन रेशीम धागा निर्मिती केंद्र कार्यान्वित असून तेथे शेतकऱ्यांचे कोष खरेदी करून धागा निर्मिती केली जाते. जिल्ह्यासाठी रेशीम विभागास ३५० एकर, कृषी विभागास ४०० एकर व जिल्हा परिषदेस ३५० एकर असे एकूण ११०० एकर नवीन शेतकरी नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. रेशीम विभागाने जिल्ह्यातील निवडक १४६ गावांमध्ये ३५० एकर लक्षाकांपोटी ७०० एकर नवीन शेतकरी नोंदणीचे नियोजन केलेले आहे. महा रेशीम अभियान कालावधीमध्ये निवड केलेल्या गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन नवीन शेतकरी नोंदणीसाठी रेशीम उद्योगाविषयी माहिती, मार्गदर्शन, जन जागृती,प्रचार व प्रसिद्धी केली जाणार असल्याचे रेशीम विकास अधिकारी बी. डी.डेंगळे यांनी सांगीतले.

**विविध योजनांतर्गत अर्थसहाय्य**

रेशीम उद्योगाच्या वाढीसाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (जी-राम-जी) अंतर्गत अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी तीन वर्षात ८९५ मनुष्य-दिवसांअंतर्गत मजुरी २ लक्ष ७९ हजार २४० रुपये व साहित्यासाठी १ लक्ष ५३ हजार रुपये असे एकूण ४ लक्ष ३२ हजार २४० रुपये अनुदान दिले जाते. तसेच केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र योजनेअंतर्गत तुती लागवड, सिंचन संच, कीटक संगोपनगृह बांधकाम, संगोपन साहित्य व निर्जंतुकीकरण औषधींसाठी एकूण ३ लक्ष ७५ हजार रुपये अनुदान देण्यात येते. सिल्क समग्र-२ अंतर्गत बहुभूधारक शेतकऱ्यांना २ एकर तुती लागवडीसाठी ५ लक्ष ६२ हजार ५०० रुपये अनुदान मिळते. तसेच कृषी विभागाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) अंतर्गत तुती लागवडीसाठी ४५ हजार रुपये, रेशीम कीटक संगोपन गृहासाठी २ लक्ष ४३ हजार ७५० रुपये व संगोपन साहित्यासाठी ३६ हजार ३७५ रुपये, असे एकूण ३ लक्ष २५ हजार १२५ रुपये अनुदान दिले जाते.सन २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांनी समूहाने मनरेगा, सिल्क समग्र-२ व पोकरा योजनेंतर्गत तसेच वैयक्तिक स्वरूपात नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी बी.डी.डेंगळे यांनी केले आहे.

**ऑनलाईन नोंदणी :-** https://textileservices.mahaonline.gov.in/ या लिंकवरून नोंदणी करावी अथवा आपले सरकार पोर्टलवर वस्त्रोद्योग विभाग निवडावा.

अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालय,ज्ञानपिठ कॅम्पस नं.२,पहिला मजला, प्लॉट नं.टी-१८, एम आय डी सी एरीया, गरवारे स्टेडीयम समोर,नारेगाव मेन रोड, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर पिन-४३१००६, येथे संपर्क साधावा. दूरध्वनी क्रमांक : दुरध्वनी क्र.०२४०-२९९४६४७, ८६६९०९९४२२, ९७६४७०६६५२, ७०२०७७४५०५, ९९२३८९७७६७.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने महापौर व उप महापौर यांचा सत्कार

## संघटनेच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते दोन अनाथ आश्रमास ५० हजार रुपयांची आर्थिक मदत



छत्रपती संभाजीनगर दि.१७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने आज मां. महापौर व उप महापौर यांचा सत्कार करण्यात आला. आज संघटनेच्या वतीने महापौर समीर राजुरकर यांना भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेच्या वतीने मां.महापौर महोदय यांच्या हस्ते वसंतराव नाईक बाल गृह स्वराज नगर मुकुंदवाडी परिसर या संस्थेस रु.२५००० आर्थिक मदत देण्यात आली.

तसेच उप महापौर राजेंद्र जंजाळ यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी मां. उप महापौर यांच्या हस्ते संघटनेच्या वतीने भगवान बाबा बालिका आश्रम यांना रु.२५००० आर्थिक मदत देण्यात आली.

या वेळी संघटनेचे अध्यक्ष संजय सुरडकर,सचिव अपर्णा थेटे, सल्लागार विजय पाटील , उपाध्यक्ष सविता सोनवणे,अभय प्रामाणिक , अनिल तनपुरे,संजय चामले, संजय कोलते,श्रीकांत वैद्य ,भारत बिरारे, उदय मानवतकर,सह सचिव सतीश सौर,सय्यद जमशेद, सचिन भालेराव, तौसीफ अहमद, अनिल बोंडे,दीपक जावळे,अविनाश निकम, ललित सूर्यवंशी आदी अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

**I HAVE CHANGED MY NAME FROM :**
**OLD NAME :** KAVITA PAWAN SADASHIVE
TO
**NEW NAME :** KAVITA KESHAVRAO RAGDE
(AS PER MY AADHAR CARD AND PAN CARD)
*ADDRESS :* HOME NO. D-18, ARIHANT NAGAR, JAVAHAR COLONY, AURANGABAD 431001 (M. S)

(पान १ वरुन)

## दादांनी घेतलेले निर्णय दादांसोबतच गेले

सांगेन. त्याच्या या विधानावर मी विश्वास ठेवला.

आत्या, मावशी, आई म्हणून आमच्या घरातील मुलांनी कोणतेही चुकीचे काम करू नये अशी माझी सर्वांकडून अपेक्षा आहे. आमच्या घरात असेच संस्कार दिले जातात. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. या देशात कोर्टाचे निर्णय मान्य करायचे असतात. त्याचे काही नियम असतात. त्यामला मला वाटते की, तो अहवाल व कोर्टाची फायनल ऑर्डर येईपर्यंत कोणत्याही न्यायालयीन प्रकरणावर बोलणे योग्य ठरणार नाही, असे त्या म्हणाल्या.

पत्रकारांनी यावेळी सुप्रियांना पार्थ पवारांवर दबाव टाकला जात आहे का? असा प्रश्न विचारला. त्यावर त्या म्हणाल्या, तुमचा सोर्सच याची माहिती देऊ शकेल. हे कोण करतंय हे मला कसे कळणार? राज्य किंवा देशातील गोपनीय रिपोर्ट असेल तर तो बाहेर कसा आला? हा प्रश्न आहे, असे त्या म्हणाल्या.

## विमानाचा ब्लॅकबॉक्स बॉम्बस्फोटापासून...

रोहित पवारांनी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवारांचे नाव सूचवणाऱ्या ३५ आमदारांचे आभार मानले. तसेच अजित पवारांच्या अपघातावरही पुन्हा एकदा संशय व्यक्त केला. ते म्हणाले, आमच्यासाठी विलीनीकरण व राजकारण या गोष्टी दुय्यम आहेत. आज अजित पवारांच्या बाबतीत प्रॉपर तपास होणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आमचा त्यावर फोकस आहे. आज आम्ही विलीनीकरणावर चर्चा करू शकतो. बैठका घेऊ शकतो. पत्रकार परिषदा घेऊन पुरावेही सादर करू शकतो. आमच्याकडे अख्खा फोन भरून मेसेज, व्हिडिओ तथा फोनवर काय बोलणे झाले याचे पुरावे आहेत. पण मी आज त्यावर बोलणार नाही. आमच्यासाठी हा विषय संपला आहे.

मी उद्या ब्लॅकबॉक्ससह इतर मुद्यांवर सखोल पत्रकार परिषद घेणार आहे. ही पत्रकार परिषद आजच घ्यायची होती, पण आज आपल्या राज्यात परदेशातले व देशातले एक मोठे नेते येथे आलेत. आम्ही पत्रकार परिषद घेतली तर त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले असते. त्यामुळे आम्ही ही पत्रकार परिषद उद्यापर्यंत लांबणीवर टाकली आहे. सरकारकडून अजित पवारांच्या अपघाताचा अतिशय संथ गतीने तपास सुरू आहे. या प्रकरणी कुठेच काही होताना दिसत नाही. व्हिएसआर कंपनी अजूनही ऑपरेशनमध्ये आहे. आम्ही ज्या - ज्या गोष्टी प्रेडिक्ट केल्या होत्या, त्या - त्या सर्व होताना दिसून येत आहेत.

## हर्षवर्धन सपकाळांकडून शिवप्रेमींची दिलगिरी

त्या अनुषंगाने हर्षवर्धन सपकाळ यांनी फेसबुक पोस्ट करत ''भाजपचा तीव्र शब्दात निषेध करत त्यांच्या गलिच्छ व खोडसाळपणामुळे काही शिवप्रेमी बांधवांच्या भावना दुखावल्या गेल.या त्याबद्दल मी मनःपूर्वक खेद व्यक्त करतो, माझ्या शब्दाचा गैरवापर केल्याबद्दल शिवप्रेमीं प्रति दिलगिरी व्यक्त करतो व कुणाच्याही भावनांना ठेच पोहोचण्याचा माझा हेतू नव्हता'' अशा प्रकारची फेसबुक पोस्ट सपकाळ यांनी केली आहे. तसेच, आपल्या पोस्टमध्ये अंभागातील काही ओळीही दिल्या आहेत. भले तरि देऊं कासेची लंगोटी नाठाळाचे माथी हाणू काठी असे तुकाराम महाराजांच्या अभंगातील ओळीतून सपकाळ यांनी संदेश दिलाय.

## टिपू सुलतान आणि महाराष्ट्राचा संबंध काय?...

भाजपला मदत करत आहेत. टिपू सुलतान आणि महाराष्ट्राचा संबंध नसताना त्याचा फोटो लावणे चुकीचं आहे. ज्यांनी महाराष्ट्र घडवला त्यांचे फोटो लावा.

मालेगावच्या उपमहापौरांना टिपू सुलतान प्रकरणी राजकारण करायचं आहे असा आरोप हुसेन दलवाई यांनी केला. समाजवादी पक्ष जरी इंडिया आघाडीत असला तरी निवडणूक काळात ती धर्मांध पक्षांना मॅनेज झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

राजकारण करताना त्यामध्ये धर्म कशाला आणता असा प्रश्न हुसेन दलवाई यांनी विचारला. धर्माचं राजकारण सोडून राज्यातील इतर प्रलंबित प्रश्नावर चर्चा का केली जात नाही असाही प्रश्न दलवाईंनी विचारला.

## राज्य सरकारने अजितदादा अन् माझी केस...

रोहित पवारांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं की, महाराष्ट्र भूषण पुरस्कारावेळी १४ सामान्य लोकांचा मृत्यू झाला होता, एसआयटी स्थापन झाली, पण काय झालं त्यापुढे एसआयटीचं, धुळखात पडली, लोणचं घालायचा आहे का सगळ्या एसआयटीचं? असा विषय आहे त्यामुळे सरकार काय करतं, कुठेतरी एखाद्या विषयावर पडदा टाकण्यासाठी आम्ही तपास करतोय, पण ते मेट्रोचा भाग पडलाच कसा? त्यामध्ये एखाद्या गरीब सामान्य व्यक्तीचा, मध्यमवर्गीयाचा, मृत्यू त्या ठिकाणी होत असेल तर माणूस तर गेलाच पण शेवटी त्या परिवाराचा काय होतं, ते तुम्ही आम्हाला विचारा, त्यामुळे जे अमित ठाकरे बोलत आहे ते खरं आहे, या राज्यातून जे काही नेते आहेत त्यांच्या मनातून आणि अधिकाऱ्यांच्या मनातून माणुसकी संपली आहे असं आपल्याला म्हणावं लागेल, असंही रोहित पवारांनी म्हटलं आहे.

## मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणातील...

घोटाळ्यातून क्लीन चिट मिळाल्यामुळे पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा झाल्याचे सांगितले जाते. अजित पवार यांच्या निधनानंत सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या खासदारकीचा राजीनामा दिला होता. त्या जागी पार्थ पवार यांची वर्णी लागेल, असे सांगितले जात होते. मात्र, मुंढवा जमीन घोटाळ्यामुळे पार्थ पवार यांची प्रतिमा डागाळली होती. परिणामी त्यांना थेट राज्यसभेवर पाठवल्यास भाजपच्या नैतिकतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होण्याची शक्यता होती. मात्र, खरगे समितीने क्लीन चिट दिल्याने पार्थ पवार यांचा राज्यसभेवर जाण्याचा मार्ग मोकळा मानले जात आहे.

पुण्यातील सुमारे १८०० कोटी रुपये किंमतीची महार वतन जमीन ३०० कोटी रुपयांना पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केल्यावरुन प्रचंड वादंग निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकरणाच्या चौकशीसाठी महसूल सचिव विकास खारगे यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सोमवारी या चौकशीचा अहवाल सादर केला. यामध्ये पार्थ पवार यांचा मुंढवा जमीन व्यवहाराशी संबंध नसल्याचा निष्कर्ष नोंदवण्यात आला आहे. त्याचवेळी दोन सरकार अधिकाऱ्यांच्या विरोधात कारवाईची शिफारस करण्यात आली आहे. आता चंद्रशेखर बावनकुळे हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर करतील. त्यानंतर हा अहवाल स्विकारायचा की नाही याचा निर्णय होणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.